# <u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

**मंगळवार, <u>दिनांक 05.03.2019 रोजी दुपारी 05.00 वाजता</u>** नांवामनपा स्थायी समितीची अंदाजपत्रकिय विशेष सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री खान फारुख अली इलीयाज खान, सभापती**

**<u>सर्वश्री</u>**

| | |
|---|---|
| खान मसुद अहेमद खान उस्मान खान | अ. लतीफ अ. मजीद |
| रावत भानुसिंह गयादनसिंह | वैशाली मिलिंद देशमुख |
| कल्याणकर ज्योती किशन | कोकाटे करुणा भीमराव |
| वाघमारे दयानंद नामदेव | यन्नम राजेश लक्ष्मीनारायण |
| पवळे पुजा बालाजी | अ. रशीद अ. गणी |
| फारुख हुसेन कासीम पिरान | जाधव श्रीनिवास नारायणराव |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य उपआयुक्त प्रशासन श्रीमती गिता ठाकरे, प्रभारी मुख्यलेखा परिक्षक श्रीमती शोभा मुंढे, मुख्यलेखाधिकारी श्री संतोष कंदेवार, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे सदस्य व आयुक्त लहुराज माळी, उपआयुक्त प्रशासन श्रीमती गिता ठाकरे, मुख्यलेखाधिकारी तथा मुख्य लेखा परिक्षक श्रीमती शोभा मुंढे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन अंदाजपत्रकिय विशेष सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**विषय क्रं 01**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 **चे** कलम 95 च्या अधिन राहून मा. आयुक्त, नावाशमनपा नांदेड यांनी सादर केलेले नांवाशमनपाकेचे सालसन 2018-19 चे सुधारीत व सालसन 2019-20 चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देवून ते मान्यतेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करणे बाबत.

**आयुक्त** सभागृहासमोर सालसन 2018-19 चे सुधारीत व 2019-20 चे अंदाजपत्रक सादर केले आहे. अंदाजपत्रकाचे वाचन केले आहे.

**अ. शमीम अब्दुल्ला** या वर्षीच्या अंदापत्रकाचा अभ्यास करावा लागणार आहे. आजच मा. आयुक्तांनी बजेट सादर केले आहे. परंतू हे बजेटमध्ये काय तरतुदी आहेत त्याचा अभ्यास करण्याकरीता वेळ देण्यात यावा.

**अ. रशीद अ. गणी** श्री अ. शमीम यांनी अंदाजपत्रकावर अभ्यास करण्यासाठी जो वेळ देण्यात यावा म्हणुन सुचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे

**सभापती** अंदाजपत्रक अभ्यास करण्यासाठी सदस्यांना वेळ देण्यात येते.

**सभापती** आजची अंदाजपत्रकिय विशेष सभा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे. सदरील सभेची तारीख नंतर लेखी सर्व स. सदस्यांना कळविण्यात येईल

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **( स. अजीतपालसिंघ संधू )** | **( खान फारुख अली खॉं इलीयाज खान )** |
| **नगरसचिव** | **सभापती** |
| नावाशमनपा नांदेड | स्थायी समिती |
| | नावाशमनपा नांदेड |